# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## मा. महासभा दि.०७/०६/२०१९.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.०६ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली - लाईट हाऊस - चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर – ०७ व शांतीनगर सेक्टर – ११ येथील पाणी पुरवठा पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

उपरोक्त विषयान्वंये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली - लाईट हाऊस - चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर – ०७ व शांतीनगर सेक्टर – ११ येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे गरजेचे असते. सदर देखभाल दुरूस्तीची कामे वार्षिक निविदेअंतर्गत मंजूर ठेकेदारामार्फत सुरु आहेत. उपरोक्त कामांच्या वार्षिक निविदेची मुदत संपली असल्याने पंपिंग स्टेशनची देखभाल दुरूस्ती करणेकरीता वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे. सदर कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहे.

सदर कामी रक्कम रु.८६,७४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
मा. महासभा सभा दि.०४/०६/२०१९.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ०७ :-** भाईंदर (प) येथील सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये बाधित होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (प) येथील सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत रस्ता एम.एम.आर.डी.ए. मार्फत रस्ता रुंदीकरण व क्राँक्रीटीकरणाचे काम सुरु आहे. सदर रस्तारुंदीकरणामध्ये सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत महानगरपालिकेच्या पाणी वितरण करणाऱ्या १००, १५०, २०० व ३०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिन्या बाधित होत आहेत. रस्त्याच्या क्राँक्रीटीकरणाच्या कामानंतर सदर बाधित झालेल्या जलवाहिन्यांमध्ये गळती झाल्यास दुरुस्ती काम करणे शक्य होणार नाही. त्यामुळे पाणी पुरवठा वितरण प्रणालीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर जलवाहिन्या स्थलांतरीत करणे आवश्यक आहेत.

सदर कामी रक्कम रु.१,९६,८२,१००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

D:\E DRIVE DATA\Rane\Goshwara\2019-20\Goshwara_- Mahasabha - 777 to dongari pipeline shifting.doc

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०७ / ०६ /२०१९

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक** ( ७५ ) अग्निशमन विभागाकरिता ९० मी. उंचीचे एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगपालिकेचे अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असुन शहरातील नागरिकांच्या जीवीताचे व मालमत्तेचे रक्षण करण्याकरिता कायम अद्ययावत व सुसज्ज असणे आवश्यक आहे.

मा. संचालक सो यांचे पत्र क्र. मअसे/३२एफ/२०१३/६६१ दि. १४/०५/२०१३ अन्वये ७०.०० मी. उंचीपर्यंतच्या इमारतीस अग्निशमन नाहरकत दाखला देणेबाबत काही अटीशर्तीसह पत्र दिले आहे. सदर पत्रात नमुद केल्यानुसार अग्निशमन विभागाकरीता सध्या उपलब्ध असलेले टर्न टेबल लॅडर वगळुन १ टर्न टेबल लॅडर व १ एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहन खरेदी करणे अत्यावश्यक असलेबाबत नमुद केले आहे. त्यानुसार ६८.०० मी. उंचीचे टी.टी.एल वाहन खरेदी करीता मिभा/मनपा/अग्नि/१४२६/२०१८-१९ दि. ०८/०३/२०१९ रोजी कार्यादेश प्रदान करण्यात आलेला आहे. सदर पत्रातील बहुतांश अटीशर्तींची पुर्तता करण्यात आलेली असुन सद्यस्थितीत अग्निशमन विभागाकडिल कार्यरत ५ अग्निशमन स्थानके व त्यातील उपलब्ध कर्मचारी वर्ग आणी वाहने यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| प्र मुख्य अग्निशमन अधिकारी | - ०१ |
| सब स्टेशन ऑफिसर | - ०८ |
| लिडींग फायरमन | - ११ |
| यंत्रचालक | - १२ |
| वाहनचालक | - ०८ |
| फायरमन | - ३१ |
| सफाई कामगार | - ०८ |
| मजूर | - ५० |
| ठेका वाहनचालक | - ४१ |
| ठेका मजुर | - ७० |
| **एकूण** | - २४० |

**अग्निशमन दलात उपलब्ध एकूण वाहने**

| | |
|---|---|
| १) वॉटर टेंडर | -०९ |
| २) मिनी वॉटर टेंडर | -०२ |
| ३) टँकर | -०२ |
| ४) रेस्क्यू टेंडर | -०१ |
| ५) टी. टी. एल | -०१ |
| ६) पिकअप व्हॅन | -०२ |
| ७) बोलेरो जीप | -०२ |
| ८) ॲम्ब्युलन्स | -०१ |
| **एकूण** | **- २०** |

सद्यस्थितीत वरील प्रमाणे कर्मचारी वर्ग व वाहने उपलब्ध असुन शहरात एकुण ५ अग्निशमन स्थानके कार्यरत आहेत. शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता मा. संचालक सो यांनी यापुर्वीच त्यांचे पत्र क्र. मअसे/३२एफ/ २०१३/६६१ दि. १४/०५/२०१३ अन्वये ७०.०० मी. उंचीपर्यंतच्या इमारतीस अग्निशमन नाहरकत दाखला देणेबाबत अटीशर्तीसह पत्र दिले आहे. सदर पत्रात नमुद केल्यानुसार अग्निशमन विभागाकरीता सध्या उपलब्ध असलेले टर्न टेबल लॅडर वगळुन १ टर्न टेबल लॅडर व १ एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहन खरेदी करणे अत्यावश्यक असलेबाबत नमुद केले आहे. त्यानुसार सध्या ६८.०० मी. उंचीचे टी.टी.एल वाहन खरेदी करीता मिभा/मनपा/अग्नि/१४२६/२०१८-१९ दि. ०८/०३/२०१९ रोजी कार्यादेश प्रदान करण्यात आलेला आहे.

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे मार्फत ७०.०० मी. पेक्षा अधिक उंच इमारतींकरीता तात्पुरता नाहरकत दाखला देण्यात आलेला आहे. सदरच्या इमारती या आगामी ५ वर्षात बांधुन तयार होतील अशी शक्यता आहे. त्यामुळे या इमारतींना वापर परवाना प्रदान करणेपुर्वी अग्निशमन विभाग हे अद्यावत यंत्र सामग्रीने सुसज्ज / सक्षम करणे आवश्यक आहे. अग्निशमन विभागाने सध्या ६८.०० मी उंच टी.टी.एल वाहन खरेदीची प्रक्रिया हाती घेतलेली असुन सदरचे वाहन आगामी १५ ते १६ महिन्यात अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दाखल होईल.

टी.टी.एल अथवा अे.एल.पी वाहने ही बहुतांश विदेशी बनावटीचे असल्याने सदर वाहने आयात करावी लागतात आणी त्यामुळे सदरच्या वाहन खरेदी प्रक्रियेस लागणारा कालावधी हा अधिक लागतो. सदर बाब विचाराधीन घेता विलंब टाळणेकरिता यापुर्वीच मिभा/मनपा/अग्नि/५७१/२०१८-१९ दि. ०६/०९/२०१८ रोजीचे च्या अहवालानुसार ९०.०० मी. उंचीच्या ए. एल. पी. वाहनाचे तांत्रिक तपशील मिभा/मनपा/अग्नि/७१५/२०१८-१९ दि. ०५/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे कडे तपासणी करिता पाठविण्यात आलेले होते. त्यानुसार मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडुन क्र. मअसे/३७-१५/२०१९ दि. २७/०५/२०१९ अन्वये सदरचे तांत्रिक तपशील तपासुन प्राप्त झालेले असुन वाहन खरेदी करिता मा. संचालक सो यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच सदर खरेदी महापालिका स्तरावर योग्य ती शासकीय निविदा प्रक्रिया अवलंबुन करण्यात यावी असे सुचित केले आहे.

भविष्यात ७०.०० मी. उंचीपेक्षा अधिक उंचीच्या तयार होणाऱ्या इमारतींना सक्षम अग्निशमन सेवा पुरविणे करीता अग्निशमन दल आगाऊ सुसज्ज करून ठेवल्यास भविष्यात येणाऱ्या आपत्ती करीता अग्निशमन विभाग अगदी सहजतेने सामोरे जाऊ शकेल.

मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागाची भविष्यातील गरज लक्षात घेता तसेच ७० मी. उंचीपेक्षा अधिक उंचीचे प्रस्ताव अग्निशमन विभागास प्राप्त होत असल्याने अग्निशमन विभागाकरीता ७०.०० मी. उंचीपेक्षा अधिक उंचीचे ए.एल.पी. वाहन खरेदी करणे आवश्यक बाब आहे. सदर वाहन खरेदी करिता चालु वर्षात प्रक्रिया हाती घेतल्यास मा. संचालक सो यांचे तांत्रिक मान्यतेनुसार निविदा पत्रक तयार करण्याची कार्यवाही पुर्ण करता येईल. जेणे करुन लवकरात लवकर निविदा प्रसिध्द करणे शक्य होईल.

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात तुर्तास १०० मी. उंची पर्यंतच्या इमारतींना मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे मार्फत तात्पुरता नाहरकत दाखले प्रदान करण्यात आलेले असुन त्यांना बांधकाम परवानगी देखील प्रदान करण्याची कार्यवाही नगररचना विभागामार्फत सुरू आहे. सदर इमारतींची उंची (१०० मी.) लक्षात घेता व मिरा भाईंदर शहराची भौगोलीक संरचना लक्षात घेता अग्निशमन विभागाकडे किमान ९०.०० मी. उंचीवर पोहचु शकेल अशी अद्ययावत लॅडर उपलब्ध असणे आवश्यक बाब आहे. सदर बाब विचाराधीन घेता मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता किमान ९०.०० मिटर उंचीचे एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहन खरेदी करणे उपयुक्त ठरेल.

सदर वाहना बाबत बाजारात चौकशी केली असता सदर वाहनाची अंदाजे किमान रु. २१ कोटी इतकी अपेक्षित आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नविन फायर फायटर खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रु. १६.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुद अंदाजीत खर्चापेक्षा कमी असल्याने पुरवणी अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करावी लागणार आहे. सदर अतिरिक्त तरतुद "आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षातुन करणे योग्य होईल.

तरी वरिल बाब व अग्निशमन विभगाची आवश्यकता लक्षात घेता अग्निशमन विभागाकरिता ९०.०० मी उंच ए. एल. पी. वाहन खरेदी करीता निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करणे करिता व वाहन खरेदी करिता येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

गोषवारा प्राप्त दि 03/06/2019 वेळ 12:44 am
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 93 वर्ष :- 2019-20

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
03/06/2019

आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा 11/6/19
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा सभा दि. ०७ / ०६ /२०१९

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( २० ) : वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरियल व लॅब मटेरियल खरेदी व SNCU करीता आवश्यक मनुष्यबळाकरीता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत एकूण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरीता आवश्यक औषधे, लॅब मटेरियल, सर्जिकल मटेरियलकरीता नव्याने वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे. तसेच भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय शासनाकडे वर्ग करणेची प्रक्रिया सुरु आहे. उर्वरीत उपकरणे व फर्निचर खरेदी करणे आवश्यक आहे. याकीरता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरियल व लॅब मटेरियल यांची अंदाजित यादी सोबत जोडली आहे.

सन २०१९-२० या वर्षासाठी औषधे खरेदीकरीता रु.१,००,००,०००/- रुग्णालये सर्जिकल व लॅब मटेरियल खरेदी / साहित्य देखभाल दुरुस्ती कामे करीता रु.१,५०,००,०००/- श्वानदंश/सर्पदंश/काविळ लस खरेदीकरीता रु.५०,००,०००/- रुग्णालये फर्निचर / उपकरणे खरेदी करणेकरीता रु.५,००,००,०००/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

तरी वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरियल, लॅब मटेरियल व उपकरणे व फर्निचर मागविण्यात आलेल्या निविदेतुन खरेदी करणेस व आवश्यकतेनुसार निविदा मागवून खरेदी करणेकरीताचा मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता सादर.

तसेच महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये नवजात शिशूंसाठी आठ खाटांचे Sick Newborn Care Unit (SNCU) चालू करावयाचे आहे. त्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मनुष्यबळ लागणार आहे. खालील अधिकारी व कर्मचारी करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | मासिक मानधन | वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | बालरोगतज्ज्ञ | ०१ | रु.७१,०००/- | रु.८,५२,०००/- |
| २. | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | ०४ | रु.५०,६२५/- | रु.२४,३०,०००/- |
| ३. | वैद्यकीय अधिकारी (BAMS) | | रु.३८,०००/- | -- |
| ४. | परिसेविका | ०१ | रु.३१,८४२/- | रु.३,८२,१०४/- |
| ५. | अधिपरिचारिका | १२ | रु.३१,६१३/- | रु.४५,५२,२७२/- |
| ६. | संगणक चालक | ०१ | रु.१६,६५५/- | रु.१,९९,८६०/- |
| ७. | कक्षसेवक | ०४ | रु.१३,८०३/- | रु.६,६२,५४४/- |
| ८. | सफाई कामगार | ०६ | रु.१३,८०३/- | रु.९,९३,८१६/- |
| एकूण | | २९ | | रु.१,००,७२,५९६/- |

तसेच मा. महासभा दि. १९/०५/२०१७,ठराव क्र. १६ नुसार स्थायी आस्थापनेवरील पदाच्या ९०% इतके वेतन करारतत्वावरील कर्मचाऱ्यांना देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन ७व्या वेतन आयोग महानगरपालिकेत लागू केल्यानंतर लागू होणाऱ्या वेतनश्रेणीच्या ९०% इतके वेतन करारतत्वावरील कर्मचाऱ्यांना लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

D:\Rahul Pharma\Goshvara- Furniture, Upkarne, Lab & Surgical Material & SNCU Kharedi Karnebabat.docx

उपरोक्त नमूद मनुष्यबळाच्या मानधनापोटी येणारा वार्षिक रु.१,००,७२,५९६/- खर्च "अस्थायी आस्थापना" या लेखार्शिर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीतुन करण्यास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता सादर.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

03/06/19 09:04 
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे

**मा. महासभा दि06/06/2019**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं.29:- "महापौर वर्षा मॅरेथॉन" चे आयोजन करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत "महापौर वर्षा मॅरेथान" चे आयोजन करण्यात येणार असुन, सदर महापौर वर्षा मॅरेथॉन या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी खालीलप्रमाणे बाबींची आवश्यकता आहे.

**तक्ता क्रं.1 :-**

| अ.क्र. | तपशिल | अंदाजीत खर्च | निविदेचा तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | मॅरेथॉन स्पर्धेसाठी अंतर व मार्ग निश्चित करणे | - | - |
| 2 | मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेण्याकरीता फॉर्म तसेच चेस्ट् नंबर छपाई करणे | 3,00,000/- | ऑफलाईन निविदा |
| 3 | रुग्णवाहीका, डॉक्टरर्स, नर्स, प्रथमोपचाराचे साहित्य् | - | आरोग्य् विभागा मार्फत |
| 4 | मेडल, प्रशस्तीपत्रक | 5,00,000/- | ऑनलाईन निविदा |
| 5 | स्टेज, मंडप, लाईटस, सजावट, साऊड सिस्टिम, माईक, पोडीयम, खुर्च्या इ. | 20,00,000/- | बांधकाम विभागाच्या मंजुर दराप्रमाणे |
| 6 | मॅरेथॉन सहभागी होणाऱ्या स्पर्धकांकरीता टी-शर्ट पुरवठा करणे | 10,00,000/- | ऑनलाईन निविदा |
| 7 | फोटो, व्हिडीओ शुटींग, डिव्हि.डी., ड्रोन, एल.ई.डी. स्क्रीन, जी.मी.जीप कॅमरा, मिक्स्र पुरवठा | 10,00,000/- | ऑनलाईन निविदा |
| 8 | बॅनर, होडीग्ज, फ्लेक्स् | 5,00,000/- | भांडार विभागाच्या मंजुर दराप्रमाणे |
| 9 | चहा, नाश्ता, पाणी, एनर्जी ड्रिंक, बिस्कीट, जेवण | 10,00,000/- | ऑन-लाईन निविदा |
| 10 | किरकोळ खर्च व सुत्रसंचलन मानधन | 1,00,000/- | अग्रीमव्दारे |
| 11 | वाहन पुरवठा एकुण 4 वाहने | 50,000/- | वाहन विभागाच्या मंजुर दराप्रमाणे |
| | एकुण | 64,50,000/- | |

"महापौर वर्षा मॅरेथॉन" चे आयोजन करण्यासाठी रु.64,50,000/- (अक्षरी- चौसष्ठ लाख पन्नास हजार रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन 2019-20 या सालातील अंदाजपत्रकात "महापौर चषक" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.1 कोटी तरतुद करण्यात आलेली असुन "महापौर चषक" या लेखाशिर्षाअंतर्गत मागील स्पील ओव्हर रु.75,67,872/- खर्च वजा जाता सदर लेखाशिर्षाखाली रु.24,32,128/- इतकी तरतुद शिल्लक आहे. सदर महापौर वर्षा मॅरेथॉन चे आयोजन तरतुदीच्या मर्यादेत राहुन करण्यास मंजुरीस्तव मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**(सुनिल लहाने)**
**अति-आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.7/06/2019
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( 22 ) :- सार्वजनिक शौचालये व मुतारी यांचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्ती करणेकरिता धोरण ठरविणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची शौचालयाची दैनंदिन संचलन देखभाल, साफसफाई करण्यासाठी विविध संस्थामार्फत मंजुर पुरवठा करून आरोग्य विभागाच्या नियत्रंणाखाली करण्यात येते. तसेच सदर शौचालयाची दुरूस्ती वार्षिक दराच्या निविदा धारकांकडून बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. सदर शौचालये दैनंदिन साफसफाई, देखभाल, दुरूस्ती यावर महानगरपालिकेच्या मोठया प्रमाणावर खर्च होत आहे. मा. महासभा दि.8/12/2017 ठराव क्र. 51 अन्वये सदर शौचालयाच्या दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी एकच यंत्रणा न ठेवता दैनंदिन संचलन, साफसफाई व देखभालीसाठी स्वतंत्र यंत्रणा व शौचालय दुरूस्तीसाठी स्वतंत्र यंत्रणा नेमणेसाठी मान्यता दिल्यानुसार साफसफाई व दुरूस्तीसाठी स्वतंत्र यंत्रणा नेमण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर यंत्रणेमार्फत कामे करून घेण्यात येत आहेत. वस्तुस्थित माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-M /2019-20/D.K/M-Go -3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.07 /06 /2019**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. :- 24 घनकचरा निर्मिती करणाऱ्या घरे व आस्थापनामधुन घनकचरा संकलन करण्यासाठी दर/ उपयोग्यता शुल्क दरास मंजुरी मिळणेबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याकरीता नागरिकांकडून घनकचरा शुल्क वसुल करणेस मा. विशेष महासभा दि.20/02/2018 रोजी ठराव क्र.61 अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या कर विभागामार्फत नागरिकांकडून शुल्क वसुल करणे सुरू आहे.

दि.19/12/2018 रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार "महानगरपालिका घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य नियम" प्रारुप उपविधी तयार केले आहेत. सदर उपविधीतील अनुसुची 01 मधील भाग "अ" नुसार उपयोगकर्ता शुल्क घरे / आस्थापना मधुन कचरा संकलन करण्यासाठी दर / उपयोगकर्ता शुल्क / दर खालील प्रमाणे आहेत.

| क्र. | वर्गवारी | महानगरपालिका | |
|---|---|---|---|
| | | अ व ब वर्ग (रु.) | क व ड वर्ग (रु.) |
| 1 | 100 किलोग्रॅमपेक्षा कमी किमान घनकचरा निर्मिती | दर माह | दर माह |
| 2 | दरमहा घरगुती | 60 | 50 |
| | **व्यावसायिक** | | |
| 3 | दुकाने | 90 | 75 |
| 4 | शोरुम | 120 | 100 |
| 5 | गोदामे | 120 | 100 |
| 6 | उपाहारगृहे व हॉटेल | 120 | 100 |
| 7 | राहण्याची व जवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | 150 | 125 |
| | **रूग्णालये** | | |
| 8 | पन्नास खाटांपेक्षा कमी | 120 | 100 |
| 9 | पन्नास खांटापेक्षा जास्त | 180 | 150 |
| | **संस्था** | | |
| 10 | शौक्षणिक संस्था | 90 | 75 |
| 11 | धार्मिक संस्था | 90 | 75 |
| 12 | शासकिय / निम्नशासकिय कार्यालये | 90 | 75 |
| 13 | विवाह कार्यालये | 300 | 250 |
| 14 | फेरीवाले | 180 | 150 |

टिप - उपरोक्त दर हे दरवर्षी 5% वाढविण्यात यावेत.

प्रारुप शासन उपविधीयानुसार महानगरपालिका क्षेत्रात वरील नमुद केल्याप्रमाणे घरे / आस्थापना मधुन कचरा संकलन करण्यासाठी दर / उपयोगकर्ता शुल्क लागु करणेस व शासनाकडून सदर उपविधी अंतिम झाल्यानंतर त्यामधील बदलानुसार अंतिम "महानगरपालिका घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य नियम" यानुसार दर लागू करणेस मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेस शिफारस असे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त,
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Ghankachra Shulk.docx